# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जा.क्र.कडोंमपा/एचडी/एचक्यु/ ५८१
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
यांचे कार्यालय कडोंमपा, कल्याण
दिनांक :- ०३/०५/२०२३

प्रति,
प्रशासकीय अधिकारी,
पोदार इंटरनॅशनल स्कुल,
वायले नगर, कल्याण (प.)

विषय :- पोदार इंटरनॅशनल स्कुल, वायले नगर, गांधार व्हिलेज, कल्याण (प.) यांना आरोग्य विषयक नाहरकत दाखला देणेबाबत.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रशासकीय अधिकारी, पोदार इंटरनॅशनल स्कुल, वायले नगर, गांधार व्हिलेज, कल्याण (प.) यांनी सदर शाळेकरीता आवश्यक आरोग्य विभागाचा नाहरकत दाखला मागितलेला आहे. त्यानुसार मनपा क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.२१/०४/२०२३ रोजी प्रत्यक्ष पाहणी केल्यानुसार,

१) शाळेच्या सर्व वर्गात प्रकाश व हवा याकरीता खिडक्या, लाईट व फॅनची आवश्यक व्यवस्था आहे.
२) पिण्याच्या पाण्याची सोय आहे.
३) शाळेत मुले व मुलींकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह आहे व त्याची स्वच्छता राखली जात आहे.
४) प्रथमोपचार किट उपलब्ध आहे.

वरीलप्रमाणे शाळेत आरोग्य व्यवस्था योग्य असल्याने सदर शाळेस नाहरकत दाखला देण्यात येत आहे तथापि सदर व्यवस्था दैनंदिन स्वरुपात स्वच्छ व योग्य ठेवावी व पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची नियमित स्वच्छता तसेच शासनाने /महापालिकेने कोरोना विषाणु संदर्भात दिलेल्या सुचनांचे तसेच सार्वजनिक आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने या कार्यालयाकडुन वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सुचनांचे व आदेशांचे पालन करण्याचे बंधन व्यवस्थापनावर राहील.

सदर दाखला फक्त आरोग्य विषयक बाबींकरीता व अर्जात नमुद कामाकरीता मर्यादित असेल. या दाखल्याचा अन्य कामाकरीता वापर करता येणार नाही.

**प्र.वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण